**श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगांव**

**क्रिडा विभाग**

**(वार्षिक अहवाल २०१६-१७)**

१. क्रिडा विभाग व योगा विभागाच्या वतीने जागतीक योग दिनाच्या पार्श्वभूमीवर दि.२१ जुन,२०१६ (मंगळवार) रोजी प्रशिक्षण शिबीर व सुवर्ण महोत्सवी यावर्षानिमीत्त योगाभ्यास वर्गाचा वर्षपुर्ती उपक्रम समारंभ संपन्न झाला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे अध्यक्ष मा.श्री.प्रकाश दुगड,उद्घाटक म्हणून डॉ.सचिन डक तर प्रमुख पाहुणे म्हणून मा.राजाभाऊ शेजुळ,स्थानिक कार्यवाह मा.अमरनाथ खुर्पे यांची उपस्थिती होती.

२. विद्यापीठ अंतर्गत क्रिडा विभागाच्या वतीने दि.२०/०७/२०१६ रोजी आयोजित क्रिडा स्पर्धाचे वार्षिक नियोजन बैठकीस महाविद्यालयाचा प्रतिनिधी म्हणून विद्यापीठात उपस्थिती.

३. महावियालय क्रिडा विभागाच्या वतीने दि.२८/०७/२०१६ (गुरुवार) रोजी बैठक घेण्यात आली. या वेळी Student Sport Committee ची कार्यकारणी निवडण्यात आली. यावेळी चि.गोविंद नरसू शिंदे,बी ए.तृतीय वर्ष या विद्यार्थ्यांची अध्यक्ष म्हणून तर चि.अमोल अनिल उकंडे बी.ए.द्वितीय वर्ष या विद्यार्थ्यांची सचिन म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली.

४. क्रिडा विभागाच्या वतीने १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन,२३ ऑगस्ट विद्यापीठ वर्धापन दिन, १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिन, २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन व १ मे महाराष्ट्र दिन या दिवशी ध्वजारोहन उत्साहात संपन्न झाले.

५. क्रिडा विभागाच्या वतीने दि.१५ ऑगस्ट रोजी व दि.१७ सप्टेंबर रोजी अनुक्रमे भारताला कोणी ऑलिंपिक पदक जिंकून दिले व हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांचे जीवनकार्य तसेच महाराष्ट्र केसरी व्हॉलीबॉलची माहिती या विषयावरील भित्तीपत्रके प्रसिध्द करण्यात आली.

६. संस्थेच्या वतीने वाहनतळ, गेट नं.२ चा रस्ता तयार करणे, खेळाचे मैदान दुरुस्ती व स्वच्छता तसेच इतर कामाच्या जबाबदारी संस्थेच्या व मा.प्राचार्य यांच्या सहकार्याने पूर्ण केले.

७. दि.२२,२३ व २४ ऑगस्ट रोजी नॅक टिमच्या भेटीच्या पार्श्वभूमीवर क्रिडा विभागाने पूर्ण तयारीने विभागाचे मागील सहा वर्षाचा आपल्या कार्याचा लेखाजोखा सादर केला.

८. अंतर महाविद्यालय क्रिडा महोत्सव स्पर्धा २०१६ मधील जलतरण,व्हॉलीबॉल,

Scanned by CamScanner

अथेलेटिक्स,कुस्ती स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघाने सहभाग नोंदवत बीड,धर्मापुरी व औरंगाबाद येथे खेळाचे चांगले प्रदर्शन केले.

९. विशेषतः यावेळी ९ मुलींनी स्पर्धेमध्ये महाविद्यालयाच्या वतीने प्रथमच सहभाग नोंदवला होता.

१०. रोटरी क्लब,बीड च्या वतीने आयोजित मॅरेथॉन (खुला गट) स्पर्धेत महाविद्यालयाच्या क्रिडा विभागाचा खेळाडू आकाश टाकणखार व शंकर वटाणे यांनी स्पर्धेत प्रथम व द्वितीय पुरस्कार प्राप्त केले.

११. क्रिडा विभागाच्या वतीने प्रतीवर्षाप्रमाणे ६ जानेवारी २०१७ रोजी दर्पण दिन कै. बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतीमा पुजनाने साजरा केला. स्थानिक शैक्षणिक संकुलाचे सदस्य मा.बाबुराव (नाना) नाटकर व मा.प्राचार्य डॉ.क.ल.कांबळे यांच्यासह सहकारी प्राध्यापकांच्या उपस्थिती मध्ये या दर्पण दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मा.प्राचार्य डॉ.क.ल.कांबळे यांनी या दिनाचे महत्व विषद केले तर डॉ.प्रा.युवराज मुळये यांनी प्रास्तावित केले.

१२. क्रिडा विभागाच्या वतीने वार्षिक स्नेहसंमेलन निमीत्त कबड्डी व धावण्याच्या विविध स्पर्धांचे व मुली करीता संगीत खुर्ची च्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

१३. वैयक्तीक शैक्षणिक विकासाअंतर्गत लक्ष्मीबाई नॅशनल इन्स्टीस्टयुट ऑफ फिजीकल एज्युकेशनल,ग्वालियर (मध्यप्रदेश) येथे एच.आर.डी.सी. ने आयोजित केलेल्या ६७ व्या रिफ्रेशर कोर्स मध्ये सहभाग नोंदवत दि.२५ फेब्रुवारी ते दि.१७ मार्च २०१७ या दरम्यान हा कोर्स पूर्ण केला.

प्रा.उमेश रा.साडेगांवकर
क्रिडा विभाग प्रमुख

Scanned by CamScanner